**प्रेस नोट** **दिनांकरू २०/०८/२०२६.**

# पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ -२, मुंबई.

**गर्व्हमेंट इंडस्ट्रीयल इस्टेट, चारकोप, कांदिवली (प), मुंबई येथील अलंकीत क्रिएशन्स LLP, जाहरा फॅशन एरा या कारखान्यातून एकूण १३ बालमजुर कामगारांची सुटका/मुक्तता केलेबाबत.**

दिनांक - १८/०८/२०२६ रोजी विशेष मोहिमे अंतर्गत मा. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार चारकोप पोलीस ठाणे विशेष मोहिमे अंतर्गत ए.टी.सी. पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कारवाईत चारकोप इंडस्ट्रिअल इस्टेट, अलंकीत क्रिएशन्स, LLP, जाहरा फॅशन एरा, ८१ ई, गरुडा पेट्रोलपंपच्या मागे, चारकोप इंडस्ट्रीयल इस्टेट, कांदीवली (प) मुंबई या कंपनीचे मालक अंकित कुमार महेंद्र रावल य वय ३६ वर्षे, पत्ता ५९/६३ वेलजी शामजी विल्डींग, पहिला मजला, रूम नं. १४, डॉ. एम. बी वेलकर स्ट्रिट, चिरा बाजार, काळबादेवी, मुंबई व चालक सामीनुर मोतीआर रहमान शेख वय ३४ वर्षे रा. रूम नं. ०४, मातादेवी संघ, केडी कम्पाउंड, गांधीनगर, कांदिवली पश्चिम, मुंबई ६७ यांनी नमुद कंपनीत एकूण १३ बालमजूर कामगारांना कामावर ठेवून त्यांच्याकडून कष्टाची कामे करवून घेवून त्यांची शारीरिक छळवणूक व पिळवणूक करून तसेच त्यांची नीट काळजी न घेता सदर बालकांना कंपनीमध्ये काम करण्यास भाग पाडत असल्याचे मिळून आल्याने उपरोक्तप्रमाणे कंपनीचे मालक व चालक यांचेविरूध्द चारकोप पोलीस ठाणे वि.स्था.गु.र.क्र. - ६७४/२०२६ कलम - ७५, ७९ अल्पवयीन न्याय ( मुलांची काळजी व संरक्षण ) कायदा - २०१५ सह कलम - ३(अ), ३ बालकामगार (प्रतिबंध आणि विनियमन ) अधिनियम - १९८६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

**सुटका करण्यात आलेल्या १३ बालकामगारांची माहिती खालीलप्रमाणे**

**१) अबक वय अंदाजे १५ वर्षे मुळ रा. जैनेस्वरपुर, पो.उखारा, जिल्हा वर्धमान, राज्य पश्चिम बंगाल.**
**२) बकख वय अंदाजे १४ वर्षे, रा. कुंदपरा, पो. जोनीया भालुका, जिल्हा नदिया, राज्य पश्चिम बंगाल.**
**३) कखज, वय अंदाजे १६ वर्षे, रा. रायग्राम, पो. रायग्राम, जिल्हा बर्धमान, राज्य पश्चिम बंगाल.**
**४) खकग, वय अंदाजे १५ वर्षे, रा. जयक्रिश्णपुर, पो. हुगळी जिल्हा हुगळी, राज्य पश्चिम बंगाल**
**५) कगय, वय अंदाजे १४ वर्षे, रा. रायग्राम, पो. रायग्राम, जिल्हा बर्धमान, राज्य पश्चिम बंगाल.**
**६) गयच, वय अंदाजे १३ वर्षे, रा. अकाबपुर, पो. नदनघाट, जिल्हा बर्धमान, राज्य पश्चिम बंगाल.**
**७) यचझ, १६ वर्षे, रा. मामुदपुर, पो. रायग्राम, जिल्हा बर्धमान, राज्य पश्चिम बंगाल.**
**८) चछज, वय अंदाजे १७ वर्षे, रा. मामुदपुर, पो. रायग्राम, जिल्हा वर्धमान, राज्य पश्चिम बंगाल.**
**९) छजच, अंदाजे १६ वर्षे, कुंदपरा, पो. जोनीया भालुका, जिल्हा नदिया, राज्य पश्चिम बंगाल.**
**१०) चबक, वय अंदाजे १७ वर्षे, रा. राय ग्राम, पो. रायग्राम, जिल्हा बर्धमान, राज्य पश्चिम बंगाल.**
**११) बकय, वय अंदाजे १४ वर्षे, रा. मामुदपुर, पो. रायग्राम, जिल्हा वर्धमान, राज्य पश्चिम बंगाल.**
**१२) अकड, वय अंदाजे १५ वर्षे, रा. मन्तेस्वर, पो. मन्तेस्वर, जिल्हा बर्धमान, राज्य पश्चिम बंगाल.**
**१३) कखय, वय १७ वर्षे, रा. रायग्राम, पो. रायग्राम, जिल्हा बर्धमान, राज्य पश्चिम बंगाल.**

सदरची कामगिरी हि मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. सह पोलीस आयुक्त श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. शशिकुमार मिना, मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ - २ श्री. संदिप घुगे, मा. सहायक पोलीस आयुक्त, मालवणी विभाग श्री. महेशकुमार ठाकूर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चारकोप पोलीस ठाणे श्री. महेश बळवंतराव यांचे मागदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेंद्र सुर्यवंशी, सपोनि सचिन निकाळजे व अंमलदार मनिषा क-हे, संतोष तरडे, संजय पाटील, सतिश पवार यांनी केलेली आहे.